॥ नामाचा गजर ॥

गायकः पं. भीमसेन जोशी
अभंगः संत नामदेव
संगीतः राम फाटक

नामाचा गजर गर्जे भीमातीर
महीमा साजे थोर तुज एका ॥ धृ. ॥

ऋध्दी सिध्दी दासी अंगण झाडिती
उच्छिष्ठे काढिती मुक्ती चारी ॥ १ ॥

चारी वेद भाट होऊनी गर्जती
सनकादीक गाती किर्ती तुझी ॥ २ ॥

सुरवरांचे भार अंगणी लोळती
चरणरज क्षिती शिव वंदी ॥ ३ ॥

नामा म्हणे देव ऐसा हो कृपाळू
करितो सांभाळू अनाथांचा ॥ ४ ॥

साजेः सजवणे
एकाः ज्याच्या सारखे दुसरे कोणी नाही
मुक्ती चारीः चार तऱ्हेचे मोक्ष (सालोक्य, साधर्म्य, सारुप्य, सायुज्य)
सनकादिकः ब्रम्हदेवाचे चार मानस-पुत्र (सनक, सनन्दन, सनत्कुमार, सनत्सुजात)
सुरवरः देवांतले प्रमुख देव
भारः घोळके
क्षितीः पृथ्वी